# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

(गृह शाखा)

दुरध्वनी क्रमांक - 0217-2731020 ई मेल - dcbsolapur@gmail.com

वाचा :- १) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि. ४.४.२०२१, दि. ५.४.२०२१

२) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दि. ५.४.२०२१, ०६.०४.२०२१

३) भारतीय साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५ दि. १४ मार्च, २०२०.

६) मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील पत्र क्रं. बीवायई ३ २०२१/प्र.क्र.१२५/ २१/३३ दि. १६/०४/२०२१, १७/४/२०२१

७) महाराष्ट्र शासन, मदत व पुनर्वसन विभाग यांचेकडील पत्र क्रं.DMU/२०२०/CR/D १ दि. ८/४/२०२१

जा.क्र. २०२१/डिसीबी/०२/आरआर/ १७२७ दिनांक :- ०८/०४/२०२१

**विषय :- फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार सोलापूर जिल्ह्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

## आदेश :-

ज्याअर्थी, कोव्हीड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये निर्गमीत केलेले प्रतिबंधात्मक निर्देश या कार्यालयाचे वाचा क्रं. २ अन्वये सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) लागु करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, शासनाकडील प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने कोव्हीड-१९ विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी या कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनामध्ये दिनांक ०५.०४.२०२१ ते ३०.०४.२०२१ या कालावधीत सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत ५ पेक्षा जास्त व्यक्तीनां एकत्र येण्यास ( जमाव करण्यास) बंदी तसेच रात्री ८ ते सकाळी ७ वाजेपर्यंत संचार बंदी तसेच आठवड्याची शेवटी (शनिवार, रविवार) शुक्रवारी रात्री ८ ते सोमवार सकाळी ७ वाजेपर्यंत कारणाशिवाय कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी संचार करण्यास मनाई करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्रं. ६ अन्वये मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सोलापूर जिल्ह्यातील २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर जाहीर कार्यक्रमानुसार २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघासाठी दिनांक १७/४/२०२१ रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. सदरची निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडण्याकामी या कार्यालयातुन वाचा क्रं. २ अन्वये जारी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक आदेशातुन निवडणूक कामकाजासाठी सुट देणे आवश्यक असल्याचे माझे निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोव्हीड-१९ चे मोठया प्रमाणात वाढत असलेल्या रुग्ण संख्येवर आळा घालण्यासाठी या कार्यालयाच्या वाचा क्र. २ दिनांक ०५.०४.२०२१ व ०६.०४.२०२१ अन्वये जारी केलेल्या मनाई आदेश जारी केले आहेत. तथापि २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघासाठीची निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडण्याकामी वाचा क्र. २ मधील आदेशांच्या अधिन राहून खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. पंढरपूर विधानसभा मतदार संघातील निवडणूक प्रचार सभा, रॅली यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी २५२ विधानसभा मतदार संघ पंढरपूर यांनी खालील अटीवर परवानगी देण्याची कार्यवाही करावी.

a. मा.भारत निवडणूक आयोग यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार प्रचार मोहीम राबविण्या करीता राजकीय कार्यक्रमांना परवानगी असेल परंतु असे कार्यक्रम बंदीस्त ठिकाणी असल्यास उपलब्ध जागेच्या ५०% क्षमतेपर्यंत परंतु २०० पेक्षा जास्त व्यक्ती नसतील या मर्यादेत परवानगी देण्यात यावी. तसेच असे कार्यक्रम खुल्या जागेत असल्यास उपलब्ध जागेच्या ५० % क्षमतेपर्यंत परवानगी देण्यात यावी.

b. अशा मेळावाच्या ठिकाणी कोव्हीड १९ विषयक नियमांचे पालन होते किंवा कसे याची खात्री करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी/कर्मचारी नेमण्यात येईल.

c. उपरोक्त नियमांचा भंग झाल्याचे आढळून आल्यास संबंधित जागा मालकाला जबाबदार धरून आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच अशा ठिकाणी नियमाचे भंग करण्यात आलेले कृती ही गंभीर स्वरुपाची असल्यास अशा वेळेस सदर ठिकाणे / कार्यक्रम स्थळ कोव्हीड महामारी संपेपर्यंत सिल करण्यात येतील.

d. कोणत्याही उमेदवारांने राजकीय मेळाव्याचे ठरवून देण्यात आलेल्या नियमांचा दोन पेक्षा जास्त वेळेस भंग झाल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवारांना पुढील राजकीय मेळाव्यासाठी परवानगी देता येणार नाही.

e. इतर अन्य राजकीय कार्यक्रमांत उदा. रॅली, कॉर्नर सभा इत्यादी कार्यक्रमात कोव्हीड १९ विषयक नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

f. निवडणुक प्रक्रियेमध्ये सर्व उमेदवारांच्या बाबतीत उपरोक्त सर्व मार्गदर्शक तत्वे समान रितीने लागु राहतील आणि पक्षपातीपणा केल्याची तक्रार करण्यास कोणतीही संधी राहणार नाही.

g. सदर परवानगी राज्य व केंद्रशासनाने कोव्हीड १९ विषाणूचा प्रादुर्भाव न होण्याकामी ठरवून दिलेल्या नियमांचा काटेकोर पालन करण्याच्या अटीवर देण्यात यावी. यामध्ये मास्क, सॅनिटायझर वापर व सुरक्षित अंतराचे पालन होणे आवश्यक राहील तसेच या कार्यालयाचे दिनांक ५/४/२०२१ रोजीच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे काटेकोर पालन करावे.

२. कार्यालयाच्या दिनांक ०५.०४.२०२१ च्या आदेशानुसार दिनांक १०.०४.२०२१ व ११.०४.२०२१ या कालावधीत कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वैध कारणाशिवाय किंवा परवानगी शिवाय सार्वजनिक ठिकाणी संचार करण्यास बंदी आहे. तथापि या आदेशान्वये निवडणूक प्रचार व निवडणूक अनुषंगीक कामकाजास्तव दिनांक १०.०४.२०२१ रोजी सकाळी ७ वाजलेपासून ते ११.०४.२०२१ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत सदर संचारबंदी पंढरपूर विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रासाठी शिथील करण्यात येत आहे. मात्र सदर कालावधीत जमावबंदीचे मनाई आदेश लागु राहतील.

३. २५२ विधानसभा मतदार संघ पंढरपूरसाठी जाहीर झालेल्या पोटनिवडणूकीचे कार्यक्रमानुसार दिनांक १७.०४.२०२१ (शनिवार) रोजी मतदान आहे. या कार्यालयाच्या दिनांक ०५.०४.२०२१ च्या आदेशानुसार सदर दिवशी संचारबंदीचे आदेश लागु असल्याने सदर दिवशी सर्व मतदारांना त्यांचा मतदानांचा हक्क बजाविता येणेकामी या आदेशान्वये दिनांक १६.०४.२०२१ रोजी रात्री ८ वाजलेपासून ते दिनांक १८.०४.२०२१ रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत **संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी** जारी करण्यात आलेल्या संचार बंदीचा आदेश शिथिल करण्यात येत आहे. मात्र जमावबंदीचे मनाई आदेश लागु राहतील.

सदरचा आदेश दि. ०८.०४.२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

DISTRICT MAGISTRATE SOLAPUR

(मिलिंद शंभरकर, भा.प्र.से.)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

E:\E DRIVE\DCB-2\2019-2020\Corona

**प्रत– माहितीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत – आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलिस आयुक्त सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. निवडणूक निर्णय अधिकारी / सहा निवडणूक निर्णय अधिकारी २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघ
६. अधिष्ठाता,डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैदयकिय महाविद्यालय सोलापूर.
७. जिल्हा शल्य चिकीत्सक, सोलापूर
८. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
९. सर्व उपविभागीय दंडाधिकारी ---------------
१०. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर
११. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------
१२. जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर
१३. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिध्दीस्तव.
१४. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

MAGISTRATE दंडाधिकारी ... PUR